# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र : मविनिआ/माअअ/१४/२०१६/१३८३ दि. २९.०१.२०१६

प्रति,
श्री. निवृत्ती भाऊसाहेब ठोसर,
बी-१९०२, प्रियदर्शनी सहकारी गृहनिर्माण हौसिंग सोसायटी,
इंदिरा नगर नं. १, दत्त मंदीराजवळ, साईनाथनगर रोड,
घाटकोपर (पश्चिम),
मुंबई - ४०० ०८६.

**विषय :- आपला दि. २०.०१.२०१६ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये केलेला अर्ज**

महोदय,

आपला दि. २० जानेवारी २०१६ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. २५ जानेवारी, २०१६ रोजी प्राप्त झालेला आहे.

सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेल्या माहितीचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | आवश्यक माहितीचा तपशील | उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री. बाबूराव कृष्णा खांबे राहणार B-१९३१, प्रियदर्शनी सहकारी गृहनिर्माण हौसिंग सोसायटी, इंदिरा नगर नं. १, दत्त मंदीराजवळ, साईनाथनगर रोड, घाटकोपर (पश्चिम), मुंबई - ४०० ०८६ यांचा कन्जुमर नं. G- ११४२३३५१, अकाऊंट नं. १०१८२२८३७ व मीटर नं. २२५०८१५ हा मीटर आपल्याकडे केव्हापासून रजिस्टर आहे? व ऑगस्ट १९९५ या महिन्यात या मीटरचे ५४ Unit पडले होते का? याची माहिती Reliance Energy कडे मागितली असता त्यांनी लेटर दिले की, ही माहिती फक्त आम्ही Government Department लाच देऊ शकतो अन्य कोणालाही देऊ शकत नाही. तरी या मीटरची सविस्तर माहिती देण्यात यावी. | याबाबतची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. |
| २. | Reliance Energy कडे मी Fixed Charge, Wheeling Charge, Energy Charge] Fuel Adjustment Charge याची माहिती मागितली असता त्यांनी लेटर नं. ECR-3275/PBN/2015, Dated 23th December 2015 यात नमूद केले की, वरील सर्व Charges अर्थात ग्राहकांच्या घरापर्यंत वीज पुरविण्यासाठी येणारा खर्च ही ज्या त्या ग्राहकांकडून घेतला जातो. तर माझ्या रुमच्या भिंतीला १४ जणांचा मीटरबॉक्स का लावण्यात आला आहे? जर Reliance Energy वरील सर्व चार्जेस मीटर मालकाकडून घेत आहे तर माझ्या रुमच्या भिंतीला १४ जणांचे मीटर लावले आहेत त्यांचे भाडे /Rent मला भेटू | प्रश्नार्थक माहिती विचारली आहे. कुठले दस्तऐवज हवेत याचा स्पष्ट उल्लेख नाही. |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

| | | |
|---|---|---|
| | शकते का? अन्यथा Reliance Energy ने ते मीटर त्या रुममालकाच्या भिंतीवर लावून देण्यात येतील का? या १४ जणांच्या मीटरबॉक्सची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. जर भविष्यात काही दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण असणार? याची सविस्तर माहिती देण्यात यावी. | |
| ३. | श्री. बाबूराव कृष्णा खांबे यांचा मीटर नं. २२५०८१५ कन्जुमर नं. G- ११४२३३५१, व अकाऊंट नं. १०१८२२८३७ ह्या मीटरचे जून १९९३ पासून ते ८१२ Unit केव्हा पडले तसेच प्रत्येक महिन्याला किती Unit पडले यांचा माहिती देण्यात यावी. | याबाबतची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. |

उपरोक्त दिलेल्या माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री.अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदीप मोहरे)

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी